## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 445
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- २४.०६.२०२१

*निकाल प्राधान्य/तातडीचे*

प्रति,
सर्व वितरण केंद्र प्रमुख
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- सर्व वितरण केंद्र प्रमुखांनी स्विकारलेले निकाल व संबंधित साहित्य स्विकारणेबाबत व मंडळाकडे जमा करण्याबाबतच्या सुचना...**

**संदर्भ :- १. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/ ३७८ दि. १४.०६.२०२१.**
**२. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/ ३८४ दि. १५.०६.२०२१.**
**३. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप / ४३२ दि. २३.०६.२०२१.**
**४. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप / ४४३ दि. २४.०६.२०२१.**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा २०२०-२१ साठी सर्व माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य वितरण केंद्राकडे दि. **२५.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१** या कालावधीमध्ये जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

. तथापि संदर्भ क्र ३ च्या पत्रामधील तांत्रिक सुचनेप्रमाणे संगणक प्रणालीमध्ये (इ. १० वीचे) गुण भरणेचा कालावधी दिनांक **२३.०६.२०२१ ते ०२.७.२०२१** असा वाढविण्यात आला असलेमुळे सर्व माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य वितरण केंद्राकडे दि. **०१.०७.२०२१ ते ०२.०७.२०२१** या कालावधीमध्ये आपल्या शाळेच्या संबंधित वितरण केंद्रावर जमा करण्याबाबत सुचना उपरोक्त संदर्भिय पत्र क्र ४ नुसार कळविण्यात आलेले आहे. या प्रमाणे साहित्य स्विकारण्यात यावे,या तारखेनंतर कुठल्याही परिस्थितीत निकाल व साहित्य वितरण केंद्रावर स्विकारले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

आपल्या वितरण केंद्रावर तालुकानिहाय असलेल्या शाळांची यादी आपल्या माहितीसाठी आपण दिलेल्या ई मेल वर व वॉटसअप वरती पाठविण्यात येईल, त्यानुसार आपणांस यादी करणेस सुलभ होईल. जमा झालेली निकालाची पाकीटे व इतर साहित्याची यादी मंडळाकडे जमा करण्याबाबत आपणांस स्वतंत्रपणे कळविले जाईल. तसेच आपणास संलग्न शाळांची यादी सोबत Soft Copy पाठवित आहे.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank